# नि. १६ वरील आदेश

सदरचा अर्ज हा जे. डी. यांनी सी.पी.सी. आदेश २१ नियम २६ प्रमाणे दरखास्तीचे कामकाज स्थगित करण्यासाठी केलेला आहे.

२. अर्जातील कथन पुढील प्रमाणे, सदर प्रकरणातील जे.डी. यांनी रे.दि.मु.नं. ६९६/२०१२ मधील न्यायालयाच्या न्यायनिर्णयावर नाराज होवून मा. जिल्हा न्यायालय सांगली येथे रे.दि.अपिल क्र. ६०/२०२१ दाखल केलेले आहे. सदर अपिल हे त्यामधील नि. ७ स्थगिती अर्जावर आदेशाकरीता न्यायप्रविष्ठ आहे. त्यामुळे सदर अर्जाचा न्यायनिर्णय होईपर्यंत सदर दरखास्तीचे काम स्थगित करावे असा अर्ज केला आहे.

३. सदर अर्जावर दरखास्तदार (डि.एच.) यांनी नि. २३ कडे म्हणणे दाखल केले. दरखास्तदार (डि.एच.) यांनी अशी हरकत घेतली की, मा. जिल्हा न्यायाधीश सो सांगली यांचेकडे अपिल दाखल करतेवेळीच जे.डी. यांनी स्थगितीचा अर्ज दिलेला होता. परंतू अपिलीय न्यायालयाने तो अर्ज नामंजूर केला आहे. त्याचबरोबर अपिल न्याय प्रविष्ठ आहे या सबबीवर दरखास्तीचे कामकाज स्थगित करता येणार नाही. अशीही हरकत दरखास्तदार (डि.एच.) यांनी घेतली.

४. अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले. जे.डी.चे विधिज्ञांनी दि. ०३/०२/२०२३ रोजी नि. २२ कडे पुरसीस दिली. त्यानुसार नि. २२ हाच सदर अर्जावरील युक्तीवाद समजणेत आला. दरखास्तदारचे वकील वारंवार पुकारले असता अनुपस्थित आढळून आले. अभिलेखावरील रोजनामाच्याचे अवलोकन केले असता दरखास्तदारचे (डि.एच.) चे वकील हे दि. ३०/०८/२०२३ पासून सदर प्रकरणात अनुपस्थित आढळून आले. त्यामुळे सदर अर्जावर त्यांचा युक्तीवाद ऐकून घेता आला नाही. त्याचबरोबर सदरचा अर्ज हा दि. १२/१०/२०२२ रोजी दिलेला असून त्यावर

डि.एच. चे वकीलांनी आपले म्हणणे दि. ०३/०२/२०२३ रोजी दिले असल्याचे अभिलेखावरील कागदपत्रांवरून दिसून येते. त्यामुळे न्यायप्रक्रियेतील विलंब टाळणेसाठी सदरचा अर्ज हा डि. एच. चे वकीलांच्या युक्तीवादाशिवाय सदरचा आदेश पारीत करण्यात आला.

५. सी.पी.सी. आदेश २१ नियम २६ चे अवलोकन केले असता दरखास्तीची अंमल बजावणी करणारे न्यायालय हे दिसून आलेल्या पुरेशा व प्रबळ कारणावरून जे.डी. यास अपिलीय न्यायालयातून दरखास्त स्थगितीचा आदेश आणेपर्यंत दरखास्तीच्या अंमलबजावणीस स्थगिती देवू शकते, असे दिसून येते. परंतू सदर कामी नि. १६ वरील अर्जात नमुद मजकुरावरून जे.डी. ने कोणतेही पुरेसे व प्रबळ कारण (Sufficient Cause) या न्यायालयासमोर आणले आहे असे म्हणता येणार नाही. त्याच बरोबर वर नमुद केल्याप्रमाणे सदरचा अर्ज दि. १२/१०/२०२२ रोजी केलेला असलेचे दिसून येते. तसेच आज रोजी पर्यंत जे.डी. ने रे.दि. अपिल नं. ६०/२०२१ मध्ये मा. जिल्हा न्यायालय सोा यांनी सदर दरखास्तीच्या कामकाजावर स्थगिती दिली किंवा कसे हे विषद करणारा कोणताही कागद या न्यायालयाच्या अभिलेखावर आणलेला नाही. त्यामुळे खाली आदेश पारीत करण्यात येत आहेत.

## आ दे श

१. जे.डी. चा नि. १६वरील अर्ज नामंजूर करण्यात येत आहे.

२. डि.एच. यांनी सदर प्रकरणात योग्य त्या स्टेप्स घ्याव्यात.

**Sd/-**

सांगली. ( श्री. ओ. एस. शास्त्री )
दिनांक –०४/०४/२०२४. **११ वे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर.**
**सांगली.**